# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग

**मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठरावाचे इतिवृत्तांतविषय क्रमांक-729 ते विषय क्रमांक-773**

**दि.:-03.03.2023 ते दि. :-02.05.2023**

**<u>प्रस्ताव क्रमांक 729/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.06.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जी-20 परिषदेच्या अनुषंगाने झोन क्र.04 अंतर्गत रंगीन गेट ते दिल्ली गेट पर्यंत Hot Applied Thermoplastic Compound ने रोड मार्कींग करणे बाबतच्या कामा साठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.14,99,700/- यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेले आहे. परंतु सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत सदरचे काम करण्यात येत आहे. त्यामूळे कामाचे स्थळ बदल करण्यात येवून टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर येथे रोड मार्कींगचे काम करणेसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदरील कामाचे स्थळ बदल करण्यात येऊन टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर येथे रोड मार्कींगचे काम करणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 729/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जी-20 परिषदेच्या अनुषंगाने झोन क्र.04 अंतर्गत रंगीन गेट ते दिल्ली गेट पर्यंत Hot Applied Thermoplastic Compound ने रोडमार्कींग करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.14,99,700/- यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2022-23 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेले आहे. परंतु सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत सदरचे काम करण्यात येत आहे. त्यामूळे कामाचे स्थळ बदल करण्यात येवून टि.व्ही. सेंटर ते सलीम अली सरोवर येथे रोड मार्कीगचे काम करणेसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

करीता, प्रस्तावात नमुद प्रमाणे कामाचे स्थळ बदल करण्यात येऊन टि.व्ही. सेंटर ते सलीग अली सरोवर येथे रोड मार्कीगचे काम करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 730/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.06.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासकीय कामासाठी खाजगी वाहन वापर धोरणा बाबत महाराष्ट्रशासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वाहन-10.05/प्र.क्र.13/2005 दि.25.05.2005 अन्वये जे शासकीय अधिकारी शासन निर्णयानुसार वाहन वापरण्यास पात्र आहेत त्यांना खाजगी वाहन शासकीय कामाकरिता वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी धोरण निश्चीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यालयीन कामासाठी स्वतःचे खाजगी वाहन वापरण्यास पेट्रोल वाहनांसाठी रु.16,375/- तर डिझेल वाहनासाठी र.रु.14,875/- प्रतिपुर्ती रक्कम देणे बाबत शासन निर्णयातील अटी व सुचनाच्या अधिन राहून अंमलबजावणी करणे बाबत निर्देशित केलेले आहे.

शासन निर्णयाच्या अधीन राहून महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.805 दि.21.12.2009 नुसार सर्वसाधारण सभेची मान्यता कार्यालयीन आदेश घेवून जा.क्र./मनपा/श.अ./2011/264 दि.09.05.2011 अन्वये महानगरपालिकेतील पात्र अधिका-यांना प्रतिपुर्तीची रक्कम शासन निर्णयानुसार सुरु करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.वाहन-1007/प्र.क्र.48/2007 दि.21.12.2007 अन्वये अधिका-यांना खाजगी वाहन वापरण्यासाठी प्रतिपुर्ती रक्कम देण्याची योजना अल्प प्रतिसादा मुळे दि.01.04.2012 पासून बंद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने स्थानिक निधी लेखापरिक्षण सन 2015-16, अर्धमास पत्र क्र.214 दि.27.01.2022 अन्वये आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरील योजना महापालिकास्तरावर पुढे चालु ठेवल्यास आर्थिक दायित्व उद्भवण्याची व भविष्यात त्याबद्दल लेखा आक्षेप येण्याची शक्यता आहे. तसेच राज्य शासन व औरंगाबाद महानगरपालिकेच्या धोरणात सुसंगती असणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेच्या अधिका-यांना प्रतिपुर्ती रक्कम

देण्याबाबतचा सर्वसाधारण सभा ठराव क्र.805 दि.21.12.2009 व त्याबाबतचा कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/श.अ./2011/264 दि.09.05.2011 रद्दबातल करणे उचीत होईल.

करिता महानगरपालिकेच्या अधिका-यांना त्यांचे स्वतःचे खाजगी चारचाकी वाहन महानगरपालिकेच्या कामासाठी वापरण्या बाबत देण्यात येत असलेली प्रतिपुर्तीची रक्कम बंद करणे व या बाबत पुर्वी झालेला ठराव व त्या अनुषंगाने कार्यालीन आदेश रदद् करण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 730/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अधिका-यांना शासकीय कामासाठी स्वतःचे वाहन वापरणे बाबत प्रतिपुर्ती रक्कम देणे संबंधी महानगरपालिकेचे धोरण शासनाच्या धोरणाशी सुसंगत असणे आवश्यक असल्याने व शासनाने सदर योजना बंद केलेली असल्याने, महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.805 दि.21.12.2009 रद्द करण्यास व सदर ठरावान्वये देण्यात येत असलेली प्रतिपुर्ती रक्कम देणे बंद करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 731/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.109 अंतर्गत देवानगरी भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 दरसुची नुसार र.रु.29,99,115/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प सन 2022-23 मध्ये नवीन डांबरी रस्ते (शहरी भाग) या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु.30 लक्ष तरतुदी मधुन प्रस्तावीत आहे.

करीता, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.29,99,115/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 731/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.109 अंतर्गत देवानगरी भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.29,99,115/- चे तयार करण्यात आले असून सदरअंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 732/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागवुन दर निश्चित करावयाचे आहेत.

प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट, कोल्हा, उदबिल्ला आणि मगर या प्राण्यांना केंद्रिय प्राणी संग्रहालय प्राधिकरण नवि दिल्ली यांचे मानकानुसार सध्या प्रतिदिनी 160 किलो बीफखाद्य खरेदी करण्यात येत आहे. सध्याचे बीफ खरेदी दर रु.186.50 प्रतिकिलो आहेत. या दरानुसार बीफ खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रु.93.39 लक्ष अपेक्षित आहे. सदर खर्च हा प्राणी देखभाल या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्या नुसार बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता, सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.93.39 लक्ष मंजुरीसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 732/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य बीफ खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.93.39 यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 733/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.04 चेतनानगर अंतर्गत हर्सुल गट नं.228/1 न्यु होनाजीनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2022-23 नुसार र.रु.1,02,47,800/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2022-23 मधील विकास योजने अंतर्गत रस्ते मजबुती करणे या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध असलेली तरतुद र.रु.2500.00 लक्ष मधून करण्यात येईल. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,02,47,800/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 733/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.04 चेतनानगर अंतर्गत हर्सुल गट नं.228/1 न्यु होनाजीनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.1,02,47,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 734/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रंजना तुळशीराम मोरे (मयत सेविका) केंद्रिय प्राथमिक शाळा नुतन माध्यमिक शाळा, ज्युब्लीपार्क यांनी स्वतःच्या ब्रेन अटॅक (Lt.MCA Infact) या आजारपणावर दि.05.07.2021 ते 07.07.2021 या कालावधीत प्रथम घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे आणि दि.07.07.2021 ते दि.12.07.2012 मॅक्स न्युरो हॉस्पिटल, पुणे येथे उपचार केला असून दरम्यान दि.12.07.2021 रोजी निधन झाले आहे. त्यासाठी रु.2,98,900/- (अक्षरी रुपये दोन लक्ष अठ्ठ्यान्नव हजार नऊशे फक्त) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.2,02,407/- असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,82,166/- आहे. त्यापैकी 5% र.रु.14,945/- (एकूण दाखल केलेले देयके रु.2,98,900/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,67,221/- (एक लक्ष सदुसष्ठ हजार दोनशे एकवीस मात्र) देय आहे.

परंतु, सदरील आजार ब्रेन अटॅक (Lt.MCA Infact) शासन मान्य आजारामध्ये येत असून संबंधीतांनी उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्यायावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही. तथापि, दि.14.05.2013 च्या परिपत्रकानुसार आरोग्य अधिकारी यांचे अधिकारात रु.1,00,000/- पर्यंत वैद्यकीय परतावा देता येतो.

शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयमधील तरतुदींच्या अधिन राहून र.रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,00,000/- ते र.रु.2,00,000/-पर्यंतचे वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असुन र.रु.2,00,000/- पेक्षा जास्त देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करीता, श्री.मती रंजना तुळशीराम मोरे, (मयत सेविका) कें.प्रा.शा.नुतन माध्यमिक शाळा, ज्युब्लीपार्क यांचे पती श्री.तुळशीराम शंकरराव मोरे, रा.नारळीबाग यांना र.रु.1,00,000/- च्या 5% र.रु.5,000/- महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 734/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रंजना तुळशीराम मोरे, (मयत सेविका) कें.प्रा.शा.नुतन माध्यमिक शाळा, ज्युब्लीपार्क यांनी स्वतःच्या ब्रेन अटॅक (Lt.MCA Infact) या आजारपणावर मॅक्स न्युरो हॉस्पिटल, पुणे येथे उपचार केला असून शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रक्कम वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली निव्वळ र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार फक्त) वैद्यकीय खर्चास

आणि सदरील खर्च त्यांचे पती श्री.तुळशीराम शंकरराव मोरे, रा.नारळीबाग यांना अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 735/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मंगेश गुलाबराव जाधव, सहशिक्षक, प्राथमिक शाळा, मिटमिटा, केंद्र बेगमपुरा यांनी त्यांच्या वडिलांच्या "Osteoarthritis (UT) hip 2 to Avascular necrosis" या आजारावर (RT) HIP Replacement हा सर्जिकल उपचार दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे दि.18.10.2020 ते 23.10.2020 या कालावधीत उपचार केले आहे. सदर आजारावर एकुण र.रु.2,60,731/- वैद्यकीय खर्च झाला असून त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.2,24,161/- असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.2,01,744/- आहे. त्यापैकी 5% र.रु.12,656/- (एकुण दाखल केलेले देयके र.रु.2,60,731 च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,89,088/- देय आहे.

सदरील आजार व उपचार विशिषोपचार पध्दती या शासनमान्य विशिष्ट उपचारामध्ये येतो. परंतु सदरील रुग्णालय विशिषोपचारासाठी शासनमान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ठ नाही. त्यामुळे संबंधीताच्या वैद्यकीय परताव्यासाठी शिफारस करण्यात आली नाही आणि संबंधीतांचा वैद्यकीय परतावा अदा करण्यासाठीचा प्रस्ताव फेटाळण्यात आलेला होता.

तथापि, प्रकरणात विशिषोपचार या आजारावर शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेणे अशी प्रकरणे यापुर्वीही सादर झालेली आहेत व भविष्यातही अशी प्रकरणे सादर होऊ शकतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे हित पाहता आरोग्य विभागाचे दि.14.05.2013 च्या परिपत्रकातील मुद्दा क्र.3 मध्ये नमुद केल्या प्रमाणे 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास र.रु.1,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत वैद्यकीय परतावा अदा करण्यास मंजुरी दिली आहे. त्याच प्रमाणे विशिषोपचारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास र.रु.1,00,000/- पर्यंतच्या कमाल मर्यादेत वैद्यकीय परतावा खर्च अदा करण्यास मा.स्थायी समिती सभेची ठराव क्र.469/2022 दि.18.07.2022 अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

तथापि, शासन निर्णय वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2 दि.16.11.2011 शासन परिपत्रक क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2 दि.09.02.2011 व शासन परिपत्रक क्र.वैखप्र-2013/प्र.क्र. 291/13/राकावि-2 दि.11.10.2013 च्या शासन निर्णयान्वये आणि आरोग्य विभागाचे जा.क्र./मनपा/ 457/2013 दि.14.05.2013 च्या परिपत्रकातील मुद्दा क्र.3 नुसार शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा विनियमात असलेल्या 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारावर उपचार केल्यास वैद्यकीय देयक परतावा मर्यादा र.रु.1,00,000/- पर्यंत विभाग प्रमुख यांच्या मंजुरीने देय राहील.

करीता, श्री.मंगेश गुलाबराव जाधव, सहशिक्षक, प्राथमिक शाळा मिटमिटा, केंद्र बेगमपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकीय खर्चास मान्यता देण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 735/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशिषोपचार या आजारावर शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेणे अशी प्रकरणे यापुर्वीही सादर झालेली आहेत व भविष्यातही अशी प्रकरणे सादर होऊ शकतात. त्यामुळे कर्मचाऱ्याचे हित पाहता आरोग्य विभागाचे दि.14.05.2013 च्या परिपत्रकातील मुद्दा क्र.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे 27 आकस्मिक व 5 गंभीरा आजारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास र.रु.1,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत वैद्यकीय परतावा अदा करण्यास मंजुरी दिली आहे. त्याचप्रमाणे विशिषोपचारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास रु.1,00,000/- पर्यंतच्या कमाल मर्यादेत वैद्यकीय परतावा खर्च

अदा करण्यास मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.469/2022 दि.18.07.2022 अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता, श्री.मंगेश गुलाबराव जाधव, सहशिक्षक, प्राथमिक शाळा मिटमिटा, केंद्र बेगमपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकीय खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 736/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, "सर्वांसाठी घरे-2022" या संकल्पनेवर आधारित "प्रधानमंत्री आवास योजनेची" प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील वास्तव्यास असलेले अर्जदार ज्यांना स्वत:चे घर नाही व ज्यांचे रु.03 लक्ष वा त्याहून कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या अर्जदारांकरीता 30 चौ.मी.चटई क्षेत्राचे पक्के घरकुल बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून एकुण र.रु.2.50 लक्ष एवढे अनुदान मिळणार आहे.

मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.1308 दि.06.02.2022 नुसार मौजे तिसगाव येथील शासकीय जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत शासन निर्णय क्र.प्रआयो/2017/प्र.क्र.-12/गृनिधो-2/शिकाना, दि.11 जानेवारी 2018 मधील तरतुदीनुसार सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर खाजगी विकासकाची नेमणुक करणे करीता निविदा मागविण्याचा ठराव पारित आहे.

"प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3" अंतर्गत गृहप्रकल्प राबविण्यासाठी मौजे पडेगाव येथील गट क्र.69 मधील 3.16 हे.आर जमीन दि.08.02.2022 रोजी व मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 मधील अनुक्रमे 4.46 हे.आर व 11.32 हे.आर.जमिन दि.07.03.2022 रोजी तसेच मौजे तीसगाव गट क्र.225/1 मधील 15.05 हे.आर. जमीन दि.08.02.2022 रोजी व मौजे तिसगाव गट क्र.227/1 मधील 86.25 हेक्टर आर. जमीन दि.02.03.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी यांनी प्रदान केली आहे. तसेच उक्त जागेवर गृहप्रकल्प उभारणी करीता सविस्तर प्रकल्प अहवालास SLSMC (राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समिती) तसेच CSMC (केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती) ची मंजुरी प्राप्त आहे.

त्याप्रमाणे घटक क्र.3 अंतर्गत परवाडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी मौजे पडेगाव गट क्र.69 व मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 तसेच मौजे तीसगाव येथील गट क्र.225/1 व 227/1 येथील नियोजीत जागेवर त्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या निव्वळ बांधकाम योग्य क्षेत्रावर Revised DPR तयार करुन प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी घटक क्र.3 अंतर्गत गृहप्रकल्पाच्या कामासाठी शासन निर्णयातील तरतुदीमधील PPP अंतर्गत खाजगी विकासकाची नेमणुक करण्या करीता निविदा मागविण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 736/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "सर्वांसाठी घरे-2022" या संकल्पनेवर आधारित "प्रधानमंत्री आवास योजनेची" अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी घटक क्र.3 अंतर्गत गृहप्रकल्पाच्या कामासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार मौजे पडेगाव येथील गट क्र.69 मधील 3.16 हे.आर. व मौजे सुंदरवाडी येथील गट क्र.9 व 10 मधील अनुक्रमे 4.46 हे.आर.व 11.32 हे.आर.तसेच मौजे तीसगाव येथील गट क्र.225/1 मधील 15.05 हे.आर.व 227/1 मधील 86.25 हे.आर. येथील नियोजीत जागेवर त्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या निव्वळ बांधकाम योग्य क्षेत्रावर Revised DPR तयार करुन पीपीपी अंतर्गत खाजगी विकासकाची नेमणुक करण्या करीता निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 737/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आरोग्य विभागाअंतर्गत कार्यान्वित आरोग्य केंद्रे, रुग्णालयांसाठी आवश्यक असणारे औषधी, कन्ज्युमेबल्स इत्यादी खरेदी करणेकरीता

Tender ID No 2022_AMCA_783450_1 नुसार एकुण 122 बाबींसाठी ई निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यामधिल M/s Austin Health care Pune, M/s Omni Healthcare Pune, व M/s Deepak Distributors Aurangabad यांचे खालील बाबी करीता दर इतर निविदाधारकांच्या तुलनेत कमी आहेत.

| SN | Item | Lords Mark Industries Pvt Ltd. | Omni Health Care Pharmacy | Austin Health care | Deepak Distributors | Remark L 1 Bidder |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Tab Calcium Carbonate-1.25gm i.e. 1250 mg Elemental calcium 500 mg Vit D3-500 iu, Strip Pack | 21.17 / each tablet | 0.60 / each tablet | **0.43 / each tablet** | 5.89 / each tablet | **M/s Austin Health care** |
| 2 | Tab. Diclofenac sodium 50 mg - Strip Pack | 6.06 / each tablet | 0.40 / each tablet | **0.23 / each tablet** | 2.17 / each tablet | **M/s Austin Health care** |
| 3 | Tab Folic Acid 5 mg. - Strip Pack | 7.56 / each tablet | 0.40 / each tablet | **0.17 / each tablet** | 2.71 / each tablet | **M/s Austin Health care** |
| 4 | Tab. Ibuprofen 400 mg - Strip Pack | 16.63 / each tablet | 1.00 / each tablet | **0.75 / each tablet** | 2.17 / each tablet | **M/s Austin Health care** |
| 5 | Tab. Ofloxacin 200 mg - Strip Pack | 17.39 / each tablet | 2.80 / each tablet | **1.21 / each tablet** | 4.80 / each tablet | **M/s Austin Health care** |
| 6 | Cap.Amoxycillin Trihydrate 250 mg. Strip Pack. | 21.17 / Each Capsule | 4.00 / Each Capsule | **1.73 / Each Capsule** | 4.49 / Each Capsule | **M/s Austin Health care** |
| 7 | Cap.Omperazole 20 mg - Strip Pack. | 15.12/ Each Capsule | 1.00 / Each Capsule | **0.54 / Each Capsule** | 1.47 / Each Capsule | **M/s Austin Health care** |
| 8 | Clotrimazole cream : Cream Clortimazole 1% w/w- 15 gm | 16.63 / Each Tube | 28.00 / Each Tube | **7.98 / Each Tube** | 19.37 / Each Tube | **M/s Austin Health care** |
| 9 | Miconzole cream: Miconazole Nitrate 2% w/w 15 gm | 21.17 / Each Tube | 20.00 / Each Tube | **7.98 / Each Tube** | 34.25 / Each Tube | **M/s Austin Health care** |
| 10 | Cream Permenthrine 5% w/w 30 gm | 0 | 30.00 / Each Tube | **15.84 / Each Tube** | 60.88 / Each Tube | **M/s Austin Health care** |
| 11 | Gel Diclofenac Diethylammonium Salt 1.16 %w/w /2.32% w/w (equivalent to Diclofenc Sod 1% w/w)-30 gm | 18.90 / Each Tube | 14.00 / Each Tube | **8.84 / Each Tube** | 120.74 / Each Tube | **M/s Austin Health care** |
| 12 | Surgical Gloves No 6.5 Operation Gloves (non-sterilized) 6.5 | 22.68 / Each Pair | 0 | **15.25 / Each Pair** | 503.75 / Each Pair | **M/s Austin Health care** |
| 13 | Surgical Gloves No 7 Operation Gloves (non-sterilized) 7 | 22.68 / Each Pair | 0 | **15.71 / Each Pair** | 558.00 / Each Pair | **M/s Austin Health care** |
| 14 | Surgical Gloves No 7.5 Operation Gloves (non-sterilized) 7.5 | 22.68 / Each Pair | 0 | **15.82 / Each Pair** | 589.00 / Each Pair | **M/s Austin Health care** |
| 15 | Tab Cefixime 200 mg. Strip Pack | 48.38 / Each Tablet | **4.50 / Each Tablet** | 4.63 / Each Tablet | 5.34 / Each Tablet | **L1 Omni Health Care** |
| 16 | Inj Drotaverine HCL 40mg 2ml (Drotin) Ampoule | 8.32 / Each Amp. | **3.00 / Each Amp.** | 0 | 36.73 / Each Amp. | **L1 Omni Health Care** |
| 17 | Inj Tranexamic Acid 5ml | 21.26 / Each Amp | **17.00 / Each Amp** | 0 | 93.69 / Each Amp | **L1 Omni Health Care** |
| 18 | Metronidazole Syp 200mg/ 5ml | 0 | 35.00 / Each Bottle | 18.60 / Each Bottle | **12.55 / Each Bottle** | **L 1 Deepak Distributors** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 19 | Ab Cotton 500gm | 189.00 / Each Bundle | 0 | 114.78 / Each Bundle | **77.50 / Each Bundle** | **L 1 Deepak Distributors** |

आरोग्य विभागास गरजेनुसार आवश्यक असणारी औषधी, कन्झ्युमेबल्स इत्यादी खरेदी करण्यासाठी उपरोक्त निविदाधारकांच्या एकुण 19 बाबींच्या एल 1 दरास व त्यानुसार खरेदीसाठी अपेक्षित एकुण र.रु.19,25,430/- खर्चास मान्यतेस्तव व फेरआढावा घेवुन अंदाजपत्रकीय मान्य र.रु.47,23,802/- यामधिल उर्वरित र.रु.27,98,372/- यामधुन विभागासाठी आवश्यक औषधी कन्झ्युमेबल्स खरेदीसाठी सुधारित अंदाजपत्रकानुसार फेरनिविदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 737/2023:-**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे**, आरोग्य विभागास गरजेनुसार आवश्यक असणारी औषधी, कन्झ्युमेबल्स इत्यादी खरेदी करण्यासाठी Tender ID No 2022_AMCA_783450_1 नुसार ई निविदामध्ये प्राप्त M/s Austin Health care Pune, M/s Omni Healthcare Pune, व M/s Deepak Distributors Aurangabad या निविदाधारकांच्या एल-1 दरास व त्यानुसार येणारा अपेक्षित रु.19,25,430/- खर्चास तसेच अंदाजपत्रकीय मान्य र.रु.47,23,802/- यामधिल उर्वरित र.रु.27,98,372/- यामधुन विभागासाठी आवश्यक औषधी कन्झ्युमेबल्स खरेदीसाठी सुधारित अंदाजपत्रकानुसार फेरनिविदा करण्यासाठी मान्यता देण्यात येते. **वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**प्रस्ताव क्रमांक 738/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका आरोग्य विभागाअंतर्गत सर्व आरोग्य केंद्रे रूग्णालयासाठी साथरोग विषयक औषधीचा पुरवठा करणेसाठी औषधी खरेदीचा प्रस्ताव खालील प्रमाणे

| S.N. | Name of Item | Proposed Qty | Remark |
|---|---|---|---|
| 1 | Tab Chloroquin 250mg | 20,000 | |
| 2 | Tab Furazolidone 100mg | 25,000 | |
| 3 | Tab Zinc Sulphate 20mg | 2,00,000 | |
| 4 | Cap Doxycycllin 100mg | 1,00,000 | |
| 5 | Cap Oseltamivir 75mg | 1000 | |
| 6 | Cap Oseltamivir 45mg | 1000 | |
| 7 | Cap Oseltamivir 30mg | 500 | |
| 8 | Cap Tetracycllin 250mg | 30,000 | |
| 9 | Sy Chloroquin 60ml | 400 | |
| 10 | Sy Oseltamivir 75ml | 100 | |
| 11 | Sy Oflaxacin + Ornidazole. Bottle of 30ml | 2600 | |
| 12 | Sy Paracetamol 60ml | 50,000 | |
| 13 | Drop Paracetamol 15ml | 25,000 | |
| 14 | Oral Rehydration Salts WHO Formula 20.5gm sachet | 2,00,000 | |
| 15 | I V Ringer Lactate 500ml | 3400 | |
| 16 | I V Normal Saline 500ml | 3000 | |
| 17 | Sol Sodium Hypo chlorite 200ml | 1,00,000 | |
| 18 | Sol Orthotoludine 500ml | 30 | |
| 19 | Chloroscope | 100 | |

उपरोक्त औषधी खरेदी करीताच्या अंदाजपत्रकात काही बाबींसाठी हाफकिन बायो फार्मास्युटीकल कार्पोरेशन लि.मुंबई खरेदी कक्ष यांचे दर, उर्वरीत बाबीसाठी इतर शासकीय संस्थाच्या ई-निविदेचे दर व बाजारभावाचे दर यांच्या आधारे **र.रु.40,64,201/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे**.

**प्रस्तावित खरेदीचा खर्च सन 2022-2023 च्या अर्थ संकल्पामधील लेखाशिर्ष**
**रोगप्रतिबंधक योजना विभाग : औषध खरेदी**
**पृष्ठ क्रमांक E-32 सांकेतांक क्रमांक 61725320001**
**तरतुद रु.100 लक्ष**

या लेखाशिर्षातुन करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

करीता उपरोक्त प्रस्तावित नुसार साथरोग विषयक औषधी खरेदी करणेसाठी अंदाजित अपेक्षित खर्च र.रु.40,64,201/- (रूपये चाळीस लक्ष चौसष्ठ हजार दोनशे एक रुपये फक्त) च्या अंदाजपत्रकास व अल्प मुदतीची ई-निविदा प्रक्रिया राबविणे करीता मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 738/2023:-</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे**, साथरोग विषयक आवश्यक औषधी खरेदी करणेसाठी अंदाजित अपेक्षित खर्च रु.40,64,201/- (रूपये चाळीस लक्ष चौसष्ठ हजार दोनशे एक रुपये फक्त) च्या अंदाजपत्रकास, अल्प मुदतीची ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व सदरील खर्च रोगप्रतिबंधक योजना विभाग:औषध खरेदी. पृष्ठ क्रमांक E-32 सांकेतांक क्रमांक 61725320001 मधिल तरतुद रु.100 लक्ष यामधुन भागविण्याकरीता मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 739/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहरातील विविध ठिकाणी असलेल्या खाजगी जागेवर असलेल्या रसवंती गृहासाठी परवानगीची मागणी होत असल्याने दरवर्षी प्रमाणे रसवंतीगृहासाठी परवानगी शुल्क प्रती माहे नैसर्गित वाढ 10 टक्के समाविष्ठ करुन रु.1650/- त्यावर 18 टक्के जीएसटी रु.297/- असे एकत्रित भाडे एक महिन्यासाठी र.रु.1947/- चा भरणा करुन महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 4 महिन्यासाठी अथवा मागणी प्रमाणे प्रती माह दराने त्यापेक्षा जास्तीत जास्त 8 महिने कालावधीसाठी परवानगी (नाहरकत) देऊन भाडे वसुली करण्यासाठी आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याच्या दृष्टिने प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 739/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध ठिकाणी असलेल्या खाजगी जागेवर असलेल्या रसवंतीगृहासाठी परवानगीची मागणी होत असल्याने दरवर्षी प्रमाणे रसवंती गृहासाठी परवानगी शुल्क प्रती माहे नैसर्गिक भाडेवाढ सह 10% समाविष्ठ करुन रु.1650/- त्यावर 18% जीएसटी रु.297/- असे एकत्रित भाडे एक महिन्यासाठी र.रु.1947/- चा भरणा करुन महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार निव्वळ तात्पुरत्या 4 महिन्यासाठी अथवा मागणी प्रमाणे प्रतीमाह दराने त्यापेक्षा जास्तीत जास्त 8 महिने कालावधीसाठी परवानगी (नाहरकत) देऊन भाडे वसुली करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 740/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.16.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्रासाठी MSEDCL च्या 11 KV HT Feeder मधुन उच्च दाबाचे कनेक्शन घेणे आहे. सदरील उच्च दाबाचे कनेक्शन घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या निर्धारित जागे पर्यंत भुमीगत केबल टाकून घेण्यासाठी MSEDCL कडून 1.3% योजने अंतर्गत र.रु.30,37,591/- खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झालो आहे. तसेच उच्च दाबाचे विद्युत कनेक्शन लघु दाबामध्ये रुपांतर करण्यासाठी D.P.Structure तयार कर.रु.न 630 KVA Transformer ची उभारणी करुन घ्यावी लागणार आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सन 2022-23 च्या दर सुचीनुसार रु.28,62,227/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे उच्च दाबाचे कनेक्शन घेणे Transformer Installation करुन हर्सुल घनकचरा प्रक्रिया केंद्रसाठी विद्युत पुरवठा सुरु करणे या कामासाठी एकुण र.रु.58,99,817/- खर्च अपेक्षित आहे. अपेक्षित र.रु.58,99,817/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली तर जाहिर निविदा मागवून काम करुन घेण्यात येईल.

करीता हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रासाठी उच्च दाबाचे कनेक्शन घेणे व ट्रान्सफॉर्मर उभारणी करणे या कामासाठी अपेक्षित रु.58,99,817/- अंदाजपत्रकीय खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 740/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रासाठी उच्च दाबाचे कनेक्शन घेणे व ट्रान्सफॉर्मर उभारणी करणे या कामासाठी अपेक्षित रु.58,99,817/- अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 741/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.17.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.36 ब्रीजवाडी भारतनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची (SSR) सन 2021-2022 नुसार र.रु.26,13,632/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम हे अर्थसंकल्प सन 2022-23 या आर्थीक वर्षाच्या देखभाल दुरुस्ती जलनि:स्स्सारण या लेखाशिर्षामधून करण्याचे प्रस्तावीत आहे. सदरील कामास मान्यता दिलेली आहे.

करीता, सदरील कामाचे अंदाजत्रक र.रु.26,13,632/- प्रशासकीय मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 741/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.36 ब्रीजवाडी भारतनगर येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.26,13,632/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 742/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.27.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत वॉर्ड क्र.10 अंतर्गत रोजाबाग येथील ईदगाह मैदानास संरक्षित भींत बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.24,98,700/- यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय या विभागाकडे प्रस्ताव पाठवून निधी उपलब्ध झाल्यावर काम हाती घेण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रु.24,98,700/- इतकेचे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 742/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत वॉर्ड क्र.10 अंतर्गत रोजाबाग येथील ईदगाह संरक्षित भींत बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु. 24,98,700/- यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 च्या एस.एस.आर.नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय या विभागाकडे प्रस्ताव पाठवून निधी उपलबध झाल्यावर काम हाती घेण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत वॉर्ड क्र.10 अंतर्गत रोजाबाग येथील ईदगाह मैदानास संरक्षित भींत बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.24,98,700/- मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येऊन अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 743/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.27.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निण्रय क्र.संकीर्ण/2715/प्र.क्र.100/13 दि.17 डिसेंबर 2016 नुसार विविध विभागातील विवक्षित कामाकरीता खालील दर्शविलेल्या पदांसाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्रता, अनुभवानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता दि.10.03.2023 रोजी सकाळी 11.30 वा.मुलाखतीलचे आयोजन करण्यात आले होते.

| अ क्र | पदाचे नाव | विवक्षित कामाचे स्वरुप | प्राप्त अर्जाची संख्या | पात्र उमेदवार | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मुख्य अग्निशमन अधिकारी 01 पद | महानगरपालिकेची अग्निशमन सेवा अधिक प्रभावीपणे राबविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने आवश्यक कामे करणे | 03 | श्री.शिवाजी बाबुराव झनझन | |
| 2. | पशु शल्य चिकित्सक 01 पद | महानगरपालिकेच्या प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/ देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणुन काम करणे | 02 | -- | एक उमेदवार अपात्र व एका उमेदवाराकडे शासकीय सेवेचा अनुभव नाही |
| 3. | उपअभियंता (स्थापत्य) (जलनि:स्सारण) 01 पद | जलनि:स्सारण विभागाअंतर्गत सातारा-देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Unicoverd Area मध्ये जलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याचे कामासाठी डीपीआर तयार करणे. | 02 | श्री.अफसर सिद्दीकी | |
| 4. | उपअभियंता (स्थापत्य) (रस्ते व बांधकाम) 01 पद | रस्ते व बांधकाम विभागांतर्गत शासकीय अनुदान व मनपा निधीमधील रस्त्यांच्या कामासाठी निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे, कार्यादेशाबाबत ची कामे | 01 | -- | आवश्यक शैक्षणि अर्हता धारण करणारे उमेदवार प्राप्त झाले नाहीत. |
| 5. | कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) 11 पदे | झोन कार्यालयातंर्गत निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे कार्यादेशा बाबतची कामे इत्यादी दैनंदिन तांत्रिक कामांवर देखरेख करणे. | 05 | -- | आवश्यक शैक्षणि अर्हता धारण करणारे उमेदवार प्राप्त झाले नाहीत. |
| | कनिष्ठ/शाखा अभियंता (स्थापत्य) 03 पदे | शहर अभियंता विभाग, कार्यकारी अभियंता (इमारत/ उद्यान) व (रस्ते/ड्रेनेज) विभागाच्या निविदा विषयक प्राप्त संचिकांची छाननी करणे, शासन निर्णयानुसार निविदा व अटी शर्ती तपासणे. | 00 | -- | एकही अर्ज प्राप्त नाही. |
| 6. | कनिष्ठ/शाखा अभियंता (विद्युत) 02 पदे | विद्युत विभागाअंतर्गत निविदा सुचना प्रसिध्द करणे, निविदा तयार करणे, तांत्रिक कागदपत्रे तयार करणे, करारनामे कायादेशा बाबतची कामे इ.दैनंदिन तांत्रिक कामांवर देखरेख करणे. | 00 | -- | एकही अर्ज प्राप्त नाही. |

वरीप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी या पदासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन व उपअभियंता (स्थापत्य) जलनि:स्सारण विभाग या पदासाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करारपध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणुक देण्यास समितीने शिफारस केली आहे.

तसेच रस्ते व बांधकाम विभागाकरीता उपअभियंता (स्थापत्य)01 पद झोन कार्यालये/शहर अभियंता/कार्यकारी अभियंता (इमारती/उद्यान) व (रस्ते/ड्रेनेज) विभागासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)-14 पदे व विद्युत विभागासाठी कनिष्ठ अभियंता (विद्युत)-02 पदे भरण्यासाठी आवश्यक ती

शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध न झाल्याने शैक्षणिक अर्हतेमध्ये पदवी अथवा पदविका असा अशत: बदल करुन पुन:श्च जाहिरात देण्याचा निर्णय घेण्यात आला.

वरील प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) मधील विहित केल्यानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी या पदासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन व उपअभियंता (स्थापत्य)-जलनि:स्सारण विभाग या पदासाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणूक देण्यास मंजुरी मिळणेस्तव व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी प्रस्तावीत केलेल्या पदांसाठी जाहिरात देणेस मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 743/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) मधील विहित केल्यानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी या पदासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन व उपअभियंता (स्थापत्य)-जलनि:स्सारण विभाग या पदासाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना विवक्षित कामासाठी प्रथमत: सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने जाहिरातीत नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणूक देण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी प्रस्तावीत केलेल्या अर्हतेनुसार उपअभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदांसाठी जाहिरात देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 744/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.27.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मा.ना.श्री.अतुल सावे, मंत्री, सहाकर, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या पत्रानुसार राजीव गांधी मैदान, सिडको एन-5 येथील क्रिडांगणावर विविध क्रिडा सुविधा विकसीत करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे बाबत पत्र दिलेले आहे.

राजीव गांधी मैदान, सिडको, एन-5 येथील क्रिडांगणावर विविध क्रिडा सुविधा विकसीत करण्यासाठी शासन निर्णय क्र.:राक्रिधो-2012/प्र.क्र.260/क्रियुसे-1 दि. 01 मार्च 2014 नुसार शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो, यास्तव 1) काँक्रिट बास्केट बॉल कोर्ट (पोस्ट व बोर्डसह), 2) बंदिस्त प्रेक्षागृह, 3) स्केटींग/बॅडमिंटन, टेनिस, व्हॉलीबॉल, लॉन टेनिस, 4) टेनिस बॉल, टेनिस नेट, लॉन, टेनिस पोल, 5) बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल, 6) जिम्नॅस्टिक्स-क्रीडा साहित्य, 7) बास्केटबॉल-नेट, पोल, 8)टेबल टेनिस व 9) मल्टीजिम/ट्रेडमिल/सायकलिंग/अद्यावत व्यायाम साहित्य इ.सर्व क्रिडा बाबी विकसीत करण्यासाठी सुमाने र.रु.189.00 लक्ष निधी मिळण्यासाठी मा.जिल्हा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी विनंती केलेली आहे.

करीता राजीव गांधी मैदान, सिडको एन-5 येथील क्रिडांगणावर विविध क्रिडा सुविधा विकसीत करण्यासाठी शासन निर्णय क्र.:राक्रिधो-2012/प्र.क्र.260/क्रियुसे-1 दि. 01 मार्च 2014 नुसार शासना कडून उपरोक्त प्रमाणे सुमारे र.रु.189.00 लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 744/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राजीव गांधी मैदान, सिडको एन-5 येथील क्रिडांगणावर विविध क्रिडा सुविधा विकसीत करण्यासाठी शासन निर्णय क्र.:राक्रिधो-2012/प्र.क्र.260/क्रियुसे-1 दि. 01 मार्च 2014 नुसार शासना कडून उपरोक्त प्रमाणे सुमारे र.रु.189.00 लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 745/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.28.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,शहरातील बुढ्ढीलाईन परिसरात औरंगाबाद महानगरपालिकेची नेहरु भवन इमारत अस्तित्वात असून या इमारतीचा पुर्नविकास करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. या कामाची निविदा काढण्यात आली असून सद्यस्थितीत या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर

आहे. प्रस्तावीत व सुधारित नियोजनानुसार या इमारतीच्या विकासात भुमजला, वाहनतळ (अ) तळ मजल्यावर : दुकाने-46, अँकर शॉप-01, समारंभ हॉल-01 व प्रदर्शनी हॉल-01 (ब) पहिल्या मजल्यावर : दुकाने-26, अँकर शॉप-01, प्रेक्षागृह (सुमारे 500 माणसी क्षमता)-01, प्रदर्शनी हॉल-01 (क) दुसऱ्या मजल्यावर : कार्यालये/गाळे-33, अँकर शॉप-01, इ.दीचा समावेश आहे.

सदर स्वरुपाच्या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून व प्रकल्पातील एक उपांग हे नाट्यगृह/प्रेक्षागृह असल्याने अनुदान स्वरुपात रु.15.00 कोटी किंवा शासनाच्या या योजनेसाठीच्या निकषानुसार ज्या रक्कमेसाठी प्रकल्प पात्र ठरेल तेवढी रक्कम अनुदान स्वरुपात टॅगोर कल्चरल स्कीम अंतर्गत मिळेल, अशी माहिती या प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) M/s Renaissance Consultant Pvt.Ltd. यांनी नमुद केले आहे. त्यासाठी या योजनेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्पातील मुख्य नाव “नेहरु भवन या इमारतीत टॅगोर कल्चरल कॉम्प्लेक्स योजने अंतर्गत विकसीत प्रेक्षागृह” असणे आवश्यक आहे.

पुर्व मंजुरी नुसार व निविदा प्रकाशीत केल्यानुसार या कामाची एकूण अंदाजपत्रकीय र.रु.32,01,93,000/- एवढी असून पार्किंग वगळता निर्माण होणारी दुकाने/गाळे, कार्यालये 30 वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या करारावर देण्याचे नियोजन केले जात आहे. सदरचा आकारास येत असलेल्या प्रकल्पाची संकल्पना ही मुळत: स्व-अर्जित धर्तीवर प्रकल्प असल्याने या प्रकल्पातील उपांगापैकी दुकाने व कार्यालये 30 वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या करारावर देण्याचे व याद्वारे संकलित होणाऱ्या रक्कमेतून एकत्रित होणारी महसुली उत्पन्नातून सदर प्रकल्पाचा खर्च भागविण्याचे नियोजन आहे. तथापि, तुर्त मनपाकडून पार्किंग, प्रेक्षागृह, बँकेट हॉल व प्रदर्शनी गॅलरी दिर्घ मुदतीच्या करारावर देण्यात येणार नसल्याने लागणाऱ्या खर्चाचा समेळ बसविण्यासाठी उक्त स्वरुपाचे अनुदानाची रक्कम केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून मिळाल्यास सदर बाब या प्रकल्पासाठी सहाय्यभूत ठरणार आहे. त्यासाठी उक्त परिच्छेदात नमुद प्रमाणे नेहरु भवन इमारतीच्या पुर्नविकासा अंतर्गत निर्माण करण्यात येत असलेल्या या प्रकल्पातील समाविष्ट एक उपांग असलेल्या प्रेक्षागृहास “नेहरु भवन या इमारतीत टॅगोर कल्चरल कॉम्प्लेक्स योजने अंतर्गत विकसीत प्रेक्षागृह” असे नाव देणे व तसे नामकरण भविष्यात प्रेक्षागृह या उपांगासाठी वापरणे योग्य वाटते.

तरी, नेहरु भवन या पुर्नविकास अंतर्गत विकसीत करण्यात येत असलेल्या इमारतीमधील प्रेक्षागृह या उपांगास नेहरु भवन अंतर्गत विकसीत “नेहरु भवन या इमारतीत टॅगोर कल्चरल कॉम्प्लेक्स योजने अंतर्गत विकसीत प्रेक्षागृह” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर तसेच या प्रकल्पाचा अनुषंगाने भविष्यात आवश्यक ते फेरबदल करण्याचा त्यास मंजुरी देणे बाबतचा अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 745/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु भवन या पुर्नविकास अंतर्गत विकसीत करण्यात येत असलेल्या इमारतीमधील प्रेक्षागृह या उपांगास केंद्र शासनाच्या टॅगोर कल्चरल कॉम्पलेक्स योजेने अंतर्गत अनुदान प्राप्त करणेस्तव “नेहरु भवन या इमारतीत टॅगोर कल्चरल कॉम्प्लेक्स योजने अंतर्गत विकसीत प्रेक्षागृह” असे नाव देण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. तसेच या प्रकल्पाचा अनुषंगाने आवश्यक ते फेरबदल करण्याचे व मंजुरी देणेचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 746/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.28.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात बैठक घेणेसाठी मिटिंग हॉल तयार करणे, (फर्निचर, इंटेरियर व विद्युत कामे) या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 दरसुची नुसार र.रु.. 1,06,64,803/- चे अंदाजपत्रक नियुक्त PMC व्दारे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र.416 दि.09/06/2022 अन्वये मान्यता प्रदान आहे. या मंजुरीनुसार सदर कामासाठी

र.रु..84,18,629/- ची निविदा दुसऱ्या वेळेस मागवली असता खालीलप्रमाणे पात्र निविदा प्राप्त झाली आहे.

1. New Era Electrical - अं.पं.दरापेक्षा 14% कमी दराने

करिता प्राप्त निविदा ही अं.प. रकमेपेक्षा 14% कमी दराची असल्याने त्यास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीसतव सादर.

**ठराव क्रमांक 746/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात बैठक घेणेसाठी मिटींग हॉल तयार करणे निविदा र.रु..84,18,629/- (फर्निचर, इंटेरियर व विद्‌युत कामे) या कामासाठी प्राप्त अं.प.दरापेक्षा 14% कमी दराची निविदा म्हणजेच न्यु ईरा ईलेक्ट्रिकल यांच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 747/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.28.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी ई टेन्डरद्वारा निवीदा मागवुन दर निश्चीत करावयाचे आहेत.

प्राणीसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवि दिल्ली, यांचे मानकानुसार मासोळी, लुसन घास, हिरवा मका, शाळु बाटुक, पशुपक्षी खाद्य, भाजीपाला व किराणा हे खाद्य पदार्थ खरेदी करण्यात येत आहे. सन-2022-23 च्या मंजुर दरानुसार खाद्य खरेदी करण्यासाठी अंदाजे वार्षिक खर्च रुपये 29.41 लक्ष अपेक्षीत आहे. सन 2023-24 साठी होणारा खर्च हा प्रागी देखभाल या लेखाशिर्पातून करण्यात येणार आहे. प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास त्या नुसार खाद्य खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते.

करीता सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रुपये 29.41 लक्ष मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर,

**ठराव क्रमांक 747/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2023-24 या एका आर्थिक वर्षासाठी प्राणीसंग्रहालयात असलेल्या प्राण्यांना देण्यात येणारे खाद्य खरेदी करण्यासाठी लागणारी अंदाजपत्रकीय तरतुद रुपये 29.41 लक्ष यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 748/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2022-2023 चे सुधारित व कलम 95 नुसार सन 2023-2024 चे जमा व खर्चाच्या मुळ अंदाजास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार अंतिम मान्यता देणे बाबत.

**ठराव क्रमांक 748/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जमा व खर्चाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच अर्थसंकल्पात महानगरपालिका फंडातून निविदा प्रक्रिया पुर्ण केलेली रु.100.00 कोटीच्या रस्त्यांची पुर्नबांधणी व मजबूतीकरण करण्याची कामे या वित्तीय वर्षात पुर्ण करण्याचा मानस आहे, तसेच प्रति वार्ड र.रु.00.50 कोटीची महसूली व भांडवली कामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, शहर सौदर्यीकरण विशेष प्रकल्प तसेच आरोग्य, शिक्षण क्रिडा घन कचरा व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन विभाग अंतर्गत पुरेशी तरतूद उपलब्ध केलेली आहे. नेहरु भवन वाणिज्यिक व्यापारी संकुले तसेच गरवारे क्रिडा संकुल व टि.व्ही. सेंटर येथील मैदान विकसीत करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अपेक्षित जमा व खर्चाच्या तरतूदी नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 103 व 104 नुसार सन 2022-2023 चे सुधारित अंदाज जमा रु.1325 कोटी 75 लक्ष 00 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. 131 कोटी 11 लक्ष 37 हजार यासह

एकुण जमा रु. 1456 कोटी 86 लक्ष 37 हजार आणि एकुण खर्च रु.1353 कोटी 99 लक्ष 75 हजार लक्षात घेता रु.102 कोटी 86 लक्ष 62 हजार शिलकीचे सुधारित त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95 नुसार सन 2023 2024 चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. 102 कोटी 86 लक्ष 62 हजार व अपेक्षित जमा रु. 2979 कोटी 02 लक्ष 50 हजार असे एकूण रु.3081 कोटी 89 लक्ष 12 हजार आणि अपेक्षित खर्च रु. 3080 कोटी 72 लक्ष 85 हजार विचारात घेता र.रु..01 कोटी रु.16 लक्ष 27 हजार शिल्लकीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 96 व 100 नुसार मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 749/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. 77 भगवती कॉलनी येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे करीता या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.26,61,750/- तयार केले आहे. या कामाची बी-1 स्वरुपाची रक्कम रु.22,36,763/- ची निविदा प्रसिध्द केली असता एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी निविदा L1 निविदाधारक मे. बालाजी सिव्हील इंडस्ट्रीज यांची 19.00% कमी दराची निविदेस मान्यता घेणेस व करार करणेस मा. प्रशासक, महानगरपालिका, औरंगाबाद यांची मान्यता प्राप्त आहे.

संदर्भ:- Tender ID.2022_AMCA_856809_2 सन 2022-2023.

| | | |
|---|---|---|
| 1 | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.07 |
| 2 | कामाचे स्वरुप | वार्ड क्र. ७७ भगवती कॉलनी येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. |
| 3 | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, औरंगाबाद महानगरपालिका या कार्यान्वयीन यंत्रणे मार्फत रक्कम रु.२६,६१,७५०/- यास ठराव क्र. ५४२/२०२२ दि.२४/११/२०२२ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.22,36,763/- |
| 4 | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • ई-निविदा व नियमाप्रमाणे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. |
| 5 | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.05.12.2022 ते दि.19.12.2022 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.21.12.2022 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | पहिली |
| 6 | एकुण किती टेंडर्स आली? | 04 (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर र.रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये | टक्केवारी |
| 1. | मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज | र.रु.22,36,763 | र.रु.18,11,800.62 | 19.00 % कमी दराने |
| 2. | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | र.रु.22,36,763 | र.रु.18,61,658.07 | 16.77 % कमी दराने |
| 3. | मे.यु.के. इन्फ्रा | र.रु.22,36,763.27/- | र.रु.21,22,688.34 | 5.10% कमी दराने |
| 4. | श्री.नदिम खान अमिनोद्दीन खान | र.रु.22,36,763.27/- | र.रु.21,66,752.58 | 3.13 %कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे | होय |

| | | |
|---|---|---|
| | काय? | |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | अर्थसंकल्प 2022-23 लेखाशिर्ष- नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग, पृष्ठ क्र.झोन-07- नविन कामे- पृ.क्र.- 01 अ.क्र.- 08 नुसार 30.00 लक्ष |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक मे.बालाजी सिव्हील इंडस्ट्रिज, औंरगाबाद यांची वॉर्ड क्र.77 भवती कॉलनी येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 19.00% कमी दराची मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. | | |

**ठराव क्रमांक 749/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त नमूद केल्या प्रमाणे सदरील कामाचे L1 निविदाधारक मे. बालाजी सिव्हिल इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांची वार्ड क्र.77 भगवती कॉलनी येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाची निविदा, मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 19.00% कमी दराची असून सदर निविदे बाबतच्या प्रस्तावास मान्यता व तदनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी,

**प्रस्ताव क्रमांक 750/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 (BLC) अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेने पी.एम.सी.आर्क असोसिएटस यांचे मार्फत 731 लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) राज्य स्तरीय सनियंत्रण समिती (SLNA) म्हाडा यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला होता. सदर DPR ला केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समिती (CSMC) च्या 42 व्या बैठकीत दि.30/01/2019 रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. या डीपीआर करिता राज्य शासनाचे रक्कम रु.2.924 कोटी व केंद्र शासनाचे रक्कम रु.3.492 कोटी अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरील अनुदान पुर्ण खर्च करण्यात आले आहे. तसेच राज्य शासनाच्या हिश्याचे रक्कम रु.2.906 कोटी भागशः खर्च झाले असून उर्वरित रक्कम खर्च करण्यात येत आहे. या डीपीआर मधील 731 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेणेसाठी टेक्स्ट लिखीत संदेश (Text Message), पत्र देऊन व वर्तमान पत्राच्या माध्यमातून जाहीर प्रगटनाद्वारे अवगत करण्यात आले आहे. तसेच समक्ष भेटून देखील लाभ घेणेसाठी त्यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. परंतु 392 लाभार्थी व्यतिरिक्त इतर लाभार्थी विविध कारणास्तव प्रतिसाद देत नाही. तसेच घरकुलाचे बांधकाम कर.रु.न योजनेचा लाभ घेणेबाबत त्यांना स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे 731 लाभार्थ्यांपैकी 392 लाभार्थी वजा जाता 339 लाभार्थ्यांना या डीपीआर मधून वगळण्याचा प्रस्ताव (Curtallment DPR) तयार करण्यात आला असून सदर डीपीआर राज्य स्तरीय सनियंत्रण समिती (SLNA) मार्फत सक्षम समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा. आयुक्त यांची दि.29.09.2022 रोजी मान्यता झालेली आहे. करिता मुळ डीपीआर 731 लाभार्थ्यापैकी 392 लाभार्थी वगळता 339 लाभार्थ्यांचा (Curtailment DPR) मा.सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 750/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) घटक क्र.4 वैयक्तिक स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 731 लाभार्थ्यांच्या मंजुर डीपीआर मधून 392 लाभार्थी वजा जाता उर्वरित 339 लाभार्थी कमी करणेचा (Curtallment DPR) राज्य स्तरीय सनियंत्रण समिती (SLNA) म्हाडा मार्फत सक्षम समितीकडे मंजुरीस्तव सादर करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 751/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मेल्ट्रॉन कोबिड सेंटर एम. आय.डी.सी. चिकलठाणा येथील इन्चार्ज वैद्यकीय अधिकारी यांनी पत्राव्दारे तेथील नव्याने सुर.रु. करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया विभागासाठी विविध काम करण्याची मागणी केल्याप्रमाणे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन कामाचे अंदाजपत्रक SSR 2021-22 नुसार तयार करण्यात आले आहे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे. वार्ड प्रवेशव्दारास दरवाजा बसविणे, शस्त्रक्रिया गृहाहासाठी अॅल्युमिनियम पार्टीशन व दरवाजा बसविणे, हात धुण्यासाठी स्वतंत्र वॉश बेसिन बसविणे, पाण्याची व ड्रेनेजची व्यवस्था करणे, खिडक्यांना AC reallic sheet बसवून सिलबंद करणे, दोन टन क्षमतेचे वातानुकूलित यंत्र बसविणे व विद्‌युत विषयक विविध कामे करणे इत्यादी कामाचा अंदाजपत्रकात समावेश केला आहे.

त्यावेळेसच्या कोरोना साथरोगाच्या काळात देण्यात आलेल्या आदेशान्वये सदरचे काम उपलब्ध कंत्राटदार मे.बालाजी सिव्हिल सव्हिसेस यांचेकडून कर.रु.न घेण्यात आले आहे. या विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी मा सर्वसाधारण सभा विषय क्र. 322/2022 दि.16.03.2022 च्या ठरावा अन्वये कुटूंब कल्याण शस्त्रक्रियागृह कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती आरोग्य विषयक व इमारतीची स्थापत्य कामे अंदाजपत्राकानुसार करण्यास मंजूरी देण्यात येते.

त्यानुसार स्थापत्य विषयक कामाचे व दुरुस्तीचे एकुण अंदाजपत्रक र.रु..61,82,947/- GST सह) चे काम कंत्राटदार में बालाजी सिव्हिल सर्व्हिसेस यांचेकडून अं.प. दराने कार्योत्तर स्वर.रु.पाने कर.रु.न घेण्यात आले आहे. करीता अं.प.र.रु.61,82,947/- यास कार्योत्तर मंजूरी प्रदान करणेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 751/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अं.प.र.रु.61.82,947/- (GST सह) यास तसेच कंत्राटदार में बालाजी सिव्हिल सर्व्हिसेस यांना अं.प. दराने कर.रु.न घेतल्याच्या कामास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येते. लेखा विभागाने या कामासाठी अर्थसंकल्प 2022-23 मध्ये आवश्यक ती तरतुद करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 752/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 31.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,, महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकामार्फत रस्त्यावरील अतिक्रमण काढतांना हातगाड्या, टपऱ्या व इतर साहित्य आणि अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणचे बांधकाम साहित्य उचलण्यात येते. सदरील साहित्य संबंधीत व्यक्तीस परत देण्यासाठी यापुर्वी लेबर चार्जेस आकारण्यात येत होते. त्यामध्ये एकसुत्रीपणा असावा याद्दष्टीने यापुर्वी आकारण्यात येणारी लेबर चार्जेसची रक्कम आणि परत करण्याचा कालावधी निश्चित करणे इ. बाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटविल्यानंतर उचलण्यात आलेले हातगाडया, तात्पुरत्या स्वर.रु.पात ठेवलेल्या टपऱ्या इ. साहित्य संबंधीतांना परत केल्यानंतर ते पुन्हा त्याच ठिकाणी अथवा इतरत्र रस्त्यावर व्यवसाय सुर.रु. करतात. त्यामुळे अशा प्रकारचे साहित्य परत करतांना उचलण्यात आल्यानंतर पुन्हा ते सार्वजनिक रस्त्यावर उभे करणार नाही असे लेखी हमीपत्र घेऊन खालीलप्रमाणे दंड आकारण्यात यावा.

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशिल** | **दंडाची रक्कम** |
|---|---|---|
| 1. | हातगाडी (वर.रु.न आच्छादन नसलेली) | र.रु.2000/- |
| 2. | हातगाडी (वर.रु.न आच्छादन असलेली)/काउंटर | र.रु.3000/- |
| 3. | टपरी (5x5 फुट आकारापर्यंत) | र.रु.4000/- |
| 4. | टपरी (5x5 फुट पेक्षा मोठी व 10x10 फुट पर्यंत) | र.रु.6000/- |

| | | |
|---|---|---|
| 5. | लोखंडी बोर्ड/डिजीटल (3x5 फुट आकारापर्यंत) | र.रु.500/- |
| 6. | लोखंडी बोर्ड/डिजीटल (3x5 फुट पेक्षा मोठा) | र.रु.1000/- |
| 7. | इलेक्ट्रीक वजन काटा | र.रु.500/- |
| 8. | तराजू काटा (हातमोजणी) | र.रु.300/- |
| 9. | खुर्च्या / स्टूल | र.रु.150/- (प्रति नग) |
| 10. | बाकडे / टेबल | र.रु.500/- (प्रति नग) |

अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणचे उचलण्यात आलेले बांधकाम साहित्य परत करतांना खालीलप्रमाणे दंड आकारण्यात यावा.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| 1. | स्लॅबच्या प्लेट | र.रु.200/- (प्रतिनग) |
| 2. | फावडे / टोपले | र.रु.100/- (प्रतिनग) |
| 3. | खोदकाम साहित्य | र.रु.200/- (प्रतिनग) |
| 4. | लोखंडी जाळी (उभे राहण्यासाठी वापरण्यात येणारी) | र.रु.300/- (प्रतिनग) |
| 5. | वाळू चाळणी | र.रु. 300/- |
| 6. | कटर मशिन, इतर मशिनरी | र.रु.1000/-(प्रतिनग) |
| 7. | इतर अवजड साहित्य | र.रु.1000/- |

उपरोक्त प्रमाणे अतिक्रमण हटाव पथकामार्फत उचलण्यात आलेले रस्त्यावरील अतिक्रमण काढतांना हातगाड्या, टपऱ्या व इतर साहित्य आणि अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणचे बांधकाम साहित्य परत करतांना उपरोक्त प्रमाणे धोरण निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 752/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकामार्फत रस्त्यावरील अतिक्रमण काढतांना हातगाड्या, टपऱ्या व इतर साहित्य आणि अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणचे बांधकाम साहित्य उचलण्यात येते. सदरील साहित्य संबंधीत व्यक्तीस परत देण्यासाठी यापुर्वी लेबर चार्जेस आकारण्यात येत होते. त्यामध्ये एकसुत्रीपणा असावा याद्दष्टीने यापुर्वी आकारण्यात येणारी लेबर चार्जेसची रक्कम आणि परत करण्याचा कालावधी निश्चित करणे इ. बाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत असून अशा प्रकारचे साहित्य परत करतांना उचलण्यात आल्यानंतर पुन्हा ते सार्वजनिक रस्त्यावर उभे करणार नाही असे लेखी घेऊन खालीलप्रमाणे दंड आकारण्यात यावा.

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशिल** | **दंडाची रक्कम** |
|---|---|---|
| 1. | हातगाडी (वर.रु.न आच्छादन नसलेली) | र.रु.2000/- |
| 2. | हातगाडी (वर.रु.न आच्छादन असलेली)/काउंटर | र.रु.3000/- |
| 3. | टपरी (5x5 फुट आकारापर्यंत) | र.रु.4000/- |
| 4. | टपरी (5x5 फुट पेक्षा मोठी व 10x10 फुट पर्यंत) | र.रु.6000/- |
| 5. | लोखंडी बोर्ड/डिजीटल (3x5 फुट आकारापर्यंत) | र.रु.500/- |
| 6. | लोखंडी बोर्ड/डिजीटल (3x5 फुट पेक्षा मोठा) | र.रु.1000/- |
| 7. | इलेक्ट्रीक वजन काटा | र.रु.500/- |
| 8. | तराजू काटा (हातमोजणी) | र.रु.300/- |
| 9. | खुर्च्या / स्टूल | र.रु.150/- (प्रति नग) |
| 10. | बाकडे / टेबल | र.रु.500/- (प्रति नग) |

तसेच अनधिकृत बांधकामाच्या ठिकाणचे उचलण्यात आलेले बांधकाम साहित्य परत करतांना खालीलप्रमाणे दंड आकारण्यास तसेच प्रस्तावात नमूद केलेले धोरण निश्चित करण्यास मंजूरी देण्यात येते.

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशिल** | **दंडाची रक्कम** |
|---|---|---|
| 1. | स्लॅबच्या प्लेट | र.रु.200/- (प्रतिनग) |
| 2. | फावडे / टोपले | र.रु.100/- (प्रतिनग) |

3. खोदकाम साहित्य र.रु.200/- (प्रतिनग)
4. लोखंडी जाळी (उभे राहण्यासाठी वापरण्यात येणारी) र.रु.300/- (प्रतिनग)
5. वाळू चाळणी र.रु. 300/-
6. कटर मशिन, इतर मशिनरी र.रु.1000/-(प्रतिनग)
7. इतर अवजड साहित्य र.रु.1000/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 753/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 31.03.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. 25 गणेश कॉलनी अंतर्गत रोज पार्क (मदरसा पासुन ते पाकिजा हॉल पर्यंत) कॉक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची (SSR) सन 2021- 2022 नुसार र.रु. 34,98,516/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी लागणा-या खर्चाची तरतुद महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2022- 2023 मध्ये नविन कॉक्रीट रस्ते शहरी भाग वर Zone-03-New Work P. No.3 Sr No. 06, 07, व 09 नुसार अनुक्रमे रु.20.00 रु.10.00 व रु.15.00 लक्ष तरतुदी मधुन रु.05.00 लक्ष असे एकुण 35.00 लक्ष या लेखाशिर्षा मध्ये उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. 34,98,516/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 753/2023:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 गणेश कॉलनी अंतर्गत रोज पार्क (मदरसा पासुन ते पाकिजा हॉल पर्यंत) कॉक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.34,98,516/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 754/2023:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक 20 दिनांक 14.01.2021 चे कृपया अवलोकन व्हावे. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील रुग्णालयांना मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट 1949 नुसार नोंदणी बाबत कार्यवाही करण्यात येते. शासनाच्या बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट 1949 च्या निर्णयानुसार 09 ते 10 खाटापर्यंत रु.300/- व 11 खाटापासून पुढील खाटाकरिता रु.600/- शुल्क आकारणी करुन 3 वर्षाकरिता नर्सिंग होम परवाना खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना देण्यात येतो. याव्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारणी करण्यात येत नाही. तसेच नर्सिंग होम नोंदणीच्या अनुषंगाने कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात येऊन नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

उपरोक्त संदर्भीय राजपत्रानुसार औरंगाबाद महानगरपालिका क वर्गात समाविष्ट असल्याने खालील प्रमाणे शुल्क आकारणी करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. शुल्क आकारणी करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या वर्गवारीनुसार महानगरपालिकेने शुल्क आकारणी करण्यात यावी असे नमुद आहे.

| अ.क्र | खाटांची संख्या | दर |
|---|---|---|
| 01 | 01 ते ०05 खाटाकरिता | रु.4000/- |
| 02 | पाच पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला प्रत्येकी पाच वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरानुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल. | |

वरील प्रमाणे अधिसुचनेत नमूद केल्याप्रमाणे खाजगी नर्सिंग होम / रुग्णालये यांच्या खाटानुसार शुल्क आकारणीबाबत अंमलबजावणी सुधारित दराने औरंगाबाद महानगरपालिका क मध्ये समाविष्ट असल्याने औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रात केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

- शुश्रुषागृहाच्या नुतणीकरणासाठी पूर्वी नोंदणी किंवा नुतनीकरणासाठी आकारलेल्या शुल्काच्या 25 टक्के वाढीव शुल्कासह शुल्क आकारणी करण्याची तरतूद नमूद आहे.

- शुश्रुषागृह नोंदणीचा किंवा नुतनीकरणाचा कालावधी ज्या वर्षात संपुष्टात येईल त्या वर्षाच्या जानेवारी महिन्यात नियम (7) च्या उपनियम (2) मध्ये निर्धारित केलेल्या शुल्कासह नमूना-बी मध्ये नोंदणी किंवा नुतनीकरणासाठी आगाऊ अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे.
- दिलेल्या परवान्याचे नुतणीकरण मुदत संपुष्टात आलेल्या वर्षाच्या पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण देणे.

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक 20, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई अधिसूचना दिनांक 14.01.2021 नुसार नर्सिंग होम नोंदणी शुल्क आकारणी करणे व नर्सिंग होमची तपासणी सर्व संबंधित आरोग्य केंद्र/रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत करणे व नर्सिंग होम परवाना 3 वर्षाकरिता देण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 754/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील खाजगी नर्सिंग होम यांना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक 20, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई अधिसूचना दिनांक 14.01.2021 नुसार शुल्क आकारणी करणे, तसेच नर्सिंग होमची तपासणी सर्व संबंधित आरोग्य केंद्र / रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत करणे व नर्सिंग होम परवाना 3 वर्षाकरिता देण्यास सर्वांनुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 755/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.03 .2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका केंद्रिय प्राथमिक शाळा सिडको एन-12 यांना स्वत:ला कोव्हिड-19 ची लागण होऊन मुत्रपिंडाचा आजार व डायबेटीस झाल्यामुळे मेडिकवर हॉस्पिटल येथे दि.19.04.2021 ते 27.07.2021 या कालावधीत उपचार केला असून त्यांचे दि.29.07.2021 रोजी निधन झाले आहे. त्यासाठी एकूण रु.8,45,540/- (अक्षरी-रुपये आठ लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे चाळीस) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.6,82,326/- असून सदर रक्कमेच्या 90% रक्कम रु. 6,14,093/- आहे. त्यापैकी 5% र.रु.42,277/- (एकुण दाखल केलेले देयके र.रु.8,45,540/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.5,71,816/- (पाच लक्ष एक्काहत्तर हजार आठशे सोळा मात्र) देय आहे.

सदरील आजार (Genito-urinary Disease) या शासनमान्य आकस्मिक आजारामध्ये येत असुन संबंधितांनी उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी मधील प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही. तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,50,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असुन र.रु.1,50,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करिता श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, मयत सहशिक्षिका यांचे पती श्री. सतिश बहाळकर यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 755/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका) केंद्रिय प्राथमिक शाळा सिडको एन-12 यांना स्वतःला मुत्रपिंडाचा आजार व डायबेटीस झाल्यामुळे मेडिकवर हॉस्पिटल येथे उपचार केला असुन संबंधितास शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकिय खर्चास मान्यता देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 756/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 31.03..2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका) केंद्रिय प्राथमिक शाळा सिडको एन-12 यांना स्वतःला कोव्हिड-19 ची लागण होऊन किडनी फेलुर/ मुत्रपिंडाचा आजारपणावर एम.जी.एम. हॉस्पिटल येथे दि.24.07.2021 ते 29.07.2021 या कालावधीत उपचार केला असून त्यांचे दि.29.07.2021 रोजी निधन झाले आहे. त्यासाठी एकूण रु.3,88,556/- (अक्षरी- रुपये तीन लक्ष अठ्ठाऐंशी हजार पाचशे छपन्न मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक र.रु.3,40,894/- असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.2,06,804/- आहे. त्यापैकी 5% र.रु.19,427/- (एकुण दाखल केलेले देयके रु.3,88,556/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा कर.रु.न उर्वरित निव्वळ देय र.रु.2,87,377/- (दोन लक्ष सत्याऐंशी हजार तीनशे सत्यात्तर मात्र) देय आहे.

सदरील आजार (Shock HT Genitouar any Diseceses) शासनमान्य आजारामध्ये येत असुन संबंधितांनी उपचार केलेले रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत यादी मधील प्रसिद्ध रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ नाही. तसेच सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच र.रु.1,50,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार आयुक्त यांना असुन र.रु.1,50,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस ना. स्थायी समितीची गंजुरी घेणे आवश्यक आहे.

करिता श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, मयत सहशिक्षिका यांचे पती श्री. सतिश बहाळकर यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 756/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रत्नप्रभा सतिश बहाळकर, (मयत सहशिक्षिका) केंद्रिय प्राथमिक शाळा सिडको एन-12 यांना स्वतःला कोव्हिड-19 ची लागण होऊन किडनी फेलुर/मुत्रपिंडाचा आजारपणावर एन.जी.एम. हॉस्पिटल येथे उपचार केला असुन संबंधितास शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून देय र.रु.1,00,000/- च्या 5% रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- वैद्यकिय खर्चास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 757/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 06.04.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यांत्रिकी विभागातील जुने भंगार साहित्य व वापरात नसलेली 37 जुन्या वाहनांची भंगार म्हणून विक्री करणे व यासाठी ई-लिलाव प्रक्रिया राबविणे आहे. स्क्रॅप वाहनांचे ऑक्शन करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दरपत्रक घेण्यात आले असून टायर्स, स्क्रॅप, प्लॅस्टीक, लोखंडी हॅम इत्यादी साहित्यासाठी स्थानिक एजन्सी कडून दरपत्रक घेण्यात आलेली आहेत.

दि.13.02.2023 रोजी लिलाव समितीची बैठक अतिरिक्त आयुक्त-1 यांच्या दालनात संपन्न झाली. या बैठकीस शहर अभियंता, मुख्यलेखाधिकारी, कार्यकारी अभियंता यांत्रिकी व इतर समिती सदस्यांची उपस्थिती होती. खालीलप्रमाणे दरास मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव/प्रकार | साहित्याचा साठा प्रत्यक्ष स्थळी कमी/जास्त धरुन | प्रस्तावित दर रुपये+GST व इतर कर अतिरिक्त | प्राप्त होणारी रक्कम प्रत्यक्ष स्थळी कमी/जास्त धरुन |
|---|---|---|---|---|
| 1 | नी स्क्रॅप केलेली वाहने 37 वाहने (36 वाहने) | 37 वाहने | 38 प्रतिकिलो | 30,82,500/- |
| 2 | एम.एस.स्क्रॅप | 16000 किलो | 33 प्रतिकिलो | 5,28,000/- |
| 3 | ॲटोमोबाईल स्पेटर पार्टस स्क्रॅप | 6000 किलो | 33प्रतिकिलो | 1,98,000/- |
| 4 | स्टील (लोखंडी) ड्रॅम | 15 नग | 360 प्रतिनग | 5,400/- |
| 5 | प्लॅस्टीक ड्रॅम | 18 नग | 435 प्रतिनग | 7,830/- |
| 6 | जुनी भंगार टायर्स | 4500 कि.ग्रॅ | 10 प्रतिकिलो | 45,0000,/- |
| | | | **एकूण** | **38,66,730/-** |

उपरोक्त प्रमाणे दरास मान्यता दिल्यानंतर लिलाव समितीने ई-ऑक्शनर नेमून लिलाव करण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत यांत्रिकी विभागास निर्देशित केले आहे.

वरीलप्रमाणे संपूर्ण भंगार साहित्याचे अंदाजे मुल्य र.रु. 38,66,730/- इतके आहे.

ई-ऑक्शनसाठी तीन शासन मान्यता प्राप्त संस्थाकडून कोटेशन मागविण्यात आले असता खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 01 | मेसर्स बिड बाजार ॲटो प्रा.लि नेरुळ, मुंबई<br>(Bld Bazaar Auto Pvt. Ltd. Nerul, Navi Mumbai) | 1.75% +18 G.S.T |
| 02 | बीपीसीएम सुपर व्हॅल्यू प्रा.लि. अंधेरी, मुंबई<br>BPCM SUPER VALUE PVT LTD.ANDHERI (EAST) MUMBAI. | 2.00% + G.S.T |
| 03 | ए.के. शर्मा व्हॅल्यू ऑक्शनर, गारखेडा, छत्रपती संभाजीनगर<br>A.K.SHARMA VALUE AUCTIONEER, GARKHEDA, CHATRAPATI SAMBHAJINAGAR | 2.5% + G.S.T |

न्युनत्तम दराच्या एजन्सी मार्फत लिलाव प्रक्रिया राबविणे उचित होईल. सर्वात कमी दराचे दरपत्रक मेसर्स बिड बाजार ॲटो प्रा.लि नेरुळ, मुंबई यांचे असून त्यांना अंदाजे 67,668/-+GST 18% इतकी रक्कम ई-लिलाव प्रक्रिया राबविण्याच्या शुल्कापोटी अदा करावी लागणार आहे.

करिता लिलाव समितीने निश्चीती केलेल्या दरास अंदाजपत्रकीय दर ग्राहय धर.रु.न मेसर्स बिड बाजार ॲटो प्रा.लि नेरुळ, मुंबई यांचे मार्फत ई-ऑक्शन करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्य व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 757/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लिलाव समितीने प्रस्तावित केलेल्या दरास व प्रस्तावात दर्शविलेल्या अंदाजित मुल्यास अदाजपत्रकीय दर ग्राहय धरुन मेसर्स बिड बाजार ॲटो प्रा.लि नेरुळ मुंबई या ई-ऑक्शनर मार्फत ऑनलाईन लिलाव प्रक्रीया राबविण्यात मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 758/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.10.04.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री जगन्नाथ गजरु मोरे, उपशिक्षक, जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उपळे वीरवाडी, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी या शाळेवर उपशिक्षक म्हणून सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे आस्थापनेवर वर्ग करुन घेण्याची विनंती केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी श्री.जगन्नाथ गजरु. मोरे यांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करिता श्री जगन्नाथ गजरु. मोरे, उपशिक्षक, जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उपळे वीरवाडी, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी, यांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 758/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री जगन्नाथ गजर.रु. मोरे, उपशिक्षक, जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा उपळे वीरवाडी, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 759/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि10.04.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.०8 अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर, मधुरबन कॉलनी गादीया विहार रोड येथील मनपाचे केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय असुन अस्तित्वातील वर्ग खोल्या कमी पडत असल्याने या ठिकाणी नविन वर्ग खोल्या बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-2022 दरसुची नुसार र.रु.1,04,84,164/- चे तयार करण्यात आले आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2022-2023 मध्ये विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु.100 लक्ष तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,04,84,164/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 759/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर, मयुरबन कॉलनी गादीया विहार रोड येथील मनपाचे केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय असून अस्तित्वातील वर्ग खोल्या कमी पडत असल्याने या ठिकाणी नविन वर्ग खोल्या बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,04,84,164/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 760/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.04.2023)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची आरोग्य केंद्रे, कार्यरत रुग्णालये व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा कडून औरंगाबाद महानगरपालिकेला कोरोना कालावधीत हस्तांतरीत झालेले तसेच कोरोना नियंत्रणात औरंगाबाद व लगतच्या जिल्ह्यांसाठी अत्यंत उपयोगी ठरलेल्या मेल्ट्रॉन रुग्णालयाच्या अद्ययावती करणाची बाब महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे. त्यानुसार महानगरपालिकेने कोव्हीड कालावधी पासून मेल्ट्रॉन व इतर रुग्णालयात रुग्णसेवेसाठी विविध अत्याधुनिक सुविधा सुरु करुन मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे. तथापि त्या ठिकाणी पुरेसे प्रशिक्षीत वैद्यकिय व निम्न वैद्यकिय मनुष्यबळ नसल्यामुळे रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांना पुरेशी सेवा देण्यात अडचणी येत आहेत.

त्यामुळे आरोग्य विभागाने विविध आरोग्य केंद्रे व मेल्ट्रॉन रुग्णालय पुर्ण क्षमतेने चालवण्यासाठी आवश्यक वैद्यकिय, निम्नवैद्यकिय, व प्रशासकिय अशा एकूण 20 संवर्गातील मनुष्यवळ पुरवठा करण्याची मागणी केली असून त्यापैकी वैद्यकिय व निम्नवैद्यकिय अशा 14 संवर्गातील मनुष्यबळाची मागणी प्रथम प्राधान्याने केलेली आहे.

यासाठी उमेदवारांच्या निवडीसाठी अतिरीक्त आयुक्त-1 यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य वैद्यकिय अधिकारी व इतर वैद्यकिय अधिकारी यांची पाच सदस्यीय समितीही गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने वैद्यकिय व निम्नवैद्यकिय अशा 14 संवर्गातील मनुष्यबळासाठी औरंगाबाद

महानगरपालिकेच्या मंजूर सेवा (रोवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील अर्हता व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (एनयुएचएम) साठी शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या अनुज्ञेय मानधनाप्रमाणे बाह्य स्त्रोत एजन्सीमार्फत मनुष्यबळ पुरवठा करण्याची मागणी आहे. तसेच महानगरपालिकेच्या आकृतीबंधात मंजूर नसलेल्या पदांची अर्हता आरोग्य विभागाने निर्धारीत केल्याप्रमाणे असेल.

आरोग्य विभागाने एकूण 14 संवर्गाची प्राधान्याने केलेली मागणी खालील प्रमाणे

| अ.क्र | पद / संवर्गाचे नांव | आवश्यक संख्या | अनुज्ञेय मानधन |
|---|---|---|---|
| 01 | क्ष-किरण तज्ञ | 01 | 75,000/- |
| 02 | भुल तज्ञ | 02 | 75000/- |
| 03 | बालरोग तज्ञ | 02 | 75000/- |
| 04 | फिजीशियन | 02 | 75000/- |
| 05 | स्त्री रोग व प्रसुती तज्ञ | 02 | 75000/- |
| 06 | आरोग्य अधिकारी | 12 | 60,000/- |
| 07 | जनरल सर्जन | 01 | 75000/- |
| 08 | फिजीओ थेरपीस्ट | 03 | 30,000/- |
| 09 | औषध निर्माण अधिकारी | 03 | 17,000/- |
| 10 | स्टाप नर्स / नर्स मिडवाईफ | 24 | 20,000/- |
| 11 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 03 | 17,000/- |
| 12 | ऑक्सिजन तंत्रज्ञ | 01 | 17,000/ |
| 13 | ई-सी-जी तंत्रज्ञ | 02 | 17,000/ |
| 14 | क्ष-किरण व सिटी स्कॅन तंत्रज्ञ | 02 | 17,000/ |

आरोग्य विभागाने केलेल्या मागणीनुसार औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2023-2024 मध्ये मेल्ट्रॉन संसर्गजन्य रुग्णालयाकरीता रु.10 कोटी इतकी तरतुद प्रस्तावित असून त्यामधून वरील खर्च करता येणार आहे. त्यामुळे कामगार विभागामार्फत निविदा प्रक्रियेद्वारे बाह्यस्त्रोत मनुष्यबळ पुरवठादाराची नियुक्ती करुन आरोग्य विभागाच्या गागणी प्रमाणे आवश्यक वैद्यकिय व निम्नवैद्यकिय मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेस सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 760/2023:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागासाठी महानगरपालिकेची आरोग्य केंद्रे व मेल्ट्रॉन रुग्णालयाकरीता आवश्यक वैद्यकिय व निम्नवैद्यकिय मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी कामगार विभागामार्फत बाह्यस्त्रोत मनुष्यबळ पुरवठादाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया कर.रु.न एजन्सी नियुक्त करणे व निवड केलेल्या बाह्यस्त्रोत मनुष्यबळ पुरवठादाराकडून आरोग्य विभागाने विभागास आवश्यक वैद्यकिय व निम्नवैद्यकिय मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर घेण्यासाठी वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 761/2023:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि11.04.2023)**

